आजचे कार्यक्रम

नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईड युनिट संस्थेच्या व अमेरिका येथील सामाजिक संस्थेचे सहकार्य मिळाल्याने दोन्ही संस्थेच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील विविध जिल्ह्यातील ७४ दृष्टिबाधित विद्यार्थ्यांना स्मार्टफोनचे वाटप. नाशिक येथील नॅब संकुल, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक, स. ११.०० वा

* गोखले एज्युकेशन सोसायटीच्या एस.एम.आर.के. महिला महाविद्यालयाचा ४१ वा वर्धापनदिन, कार्यक्रमासाठी आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. मिलिंद निकुंभ प्रमुख अतिथी तर संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. पी. देशपांडे हे विशेष अतिथी. महाविद्यालयातील पाटणकर सभागृहात स. ११ वा.

* सायंकाळी सहाला कालिदास कलामंदिरात दीप्ती माटे व राहुल देशपांडे यांचा अभंगावाणी हा भक्तिगीतांचा कार्यक्रम
* महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र-२०२५ च्या दुसऱ्या टप्प्यातील लेखी परीक्षेचे संचलन दि. २८ जून ते २३ जुलैदरम्यान महाराष्ट्र राज्यातील एकूण १६८ परीक्षा केंद्रावर संचलित होणार आहे.

* नाशिक जिल्हा सेपक टकरा असोसिएशनच्या वतीने नाशिकच्या मीनाताई ठाकरे विभागीय क्रीडा संकुल येथील इनडोअर हॉलमध्ये खुल्या गटाच्या नाशिक जिल्हा सेपक टकरा स्पर्धेतील निवड झालेले खेळाडू दि. २८ ते ३० जूनदरम्यान आयोजित महाराष्ट्र राज्य सेपक टकरा अजिंक्यपद स्पर्धेत नाशिक जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील.

सावकारी व्यावसायिकांना मार्गदर्शक सूचना

नाशिक । नाशिक जिल्ह्यातील सर्व परवानाधारक सावकारी व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ नुसार काही मार्गदर्शक सूचना सरकारकडून देण्यात आल्या असून त्याची अंमलबजावणी तत्काळ करावी, असे आवाहन सावकारांचे जिल्हा निबंधक तथा सहकारी संस्थांचे जिल्हा उपनिबंधक फयाज मुलानी यांनी केले आहे.

सावकारांकडून होणाऱ्या कर्जदार शेतकऱ्यांच्या पिळवणुकीस प्रभावी प्रतिबंध करण्यासाठी कठोर सामाजिक आणि कायदेशीर उपाययोजना करण्यासाठी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ हा कायदा अंमलात आणला आहे. सावकारांसाठी शासनाने निश्चित केलेल्या व्याजदरास सावकारी व्यवसायाच्या ठिकाणी प्रसिद्धी देणे आवश्यक आहे. कर्जासाठी आकारावयाच्या व्याजदराचा फलक व्यवसायाच्या ठिकाणी दर्शनी भागात ठळक लावावा. तसेच तो फलक शासनाने ठरवून दिलेल्या नियमात लावावा, सावकारी परवाना प्रत फलकासोबत लावण्यात यावी. फलकावर, शेतकऱ्यांकरता तारण कर्ज : नऊ टक्के प्रतिवर्षी, विनातारण कर्ज : १२ टक्के प्रतिवर्षी, इतर व्यक्तींसाठी तारण कर्ज : पंधरा टक्के प्रतिवर्षी आणि विनातारण कर्ज १८ टक्के प्रतिवर्षी याप्रमाणे व्याजदर व्यवसायाच्या ठिकाणी प्रदर्शित करावेत अशा सूचना सावकारी व्यावसायिकांना देण्यात आल्या आहेत.

सूचनांची अंमलबजावणी न करणाऱ्या सावकारांवर कायदेशीर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

नरेडको नाशिकची सर्वसाधारण सभा

होमथॉन ३.० प्रॉपर्टी एक्स्पोचे अनावरण

नाशिक । प्रतिनिधी

येथील नामांकित रिअल इस्टेट संघटना मनरेडकोफ्ची सर्वसाधारण सभा गुरुवारी (दि.२६) उत्साहात पार पडली. यावेळी महोमथॉन ३.० प्रॉपर्टी एक्स्पोफ या उपक्रमाचे अनावरण मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमास मुख्य अतिथी म्हणून नाशिक महानगरपालिका आयुक्त व प्रशासक मनीषा खत्री यांसह अतिरिक्त आयुक्त (कुंभमेळा) करिश्मा नायर, पोलीस उपायुक्त प्रशांत बच्छाव, चंद्रकांत खंडवी उपस्थित होते. नरेडको सदस्य, विविध आर्किटेक्ट, चार्टर्ड अकाउंटंट्स, आणि शहरातील प्रमुख संस्थांचे प्रतिनिधी सभेत सहभागी होते.

मनीषा खत्री यांनी नरेडको नाशिकच्या उपक्रमांचे कौतुक केले. कुंभमेळ्यात येणाऱ्या भाविकांसाठी नरेडको सदस्यांकडे असलेले फ्लॅट्स आणि ओपन प्लॉट्स पार्किंग व निवासासाठी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन सुनील गवांदे यांनी दिले.

यावेळी महोमथॉन ३.० प्रॉपर्टी एक्स्पोफ या डिसेंबर २०२५ मध्ये होणाऱ्या भव्य प्रदर्शनाची औपचारिक घोषणा करण्यात आली. यात तीनशेहून अधिक बांधकाम प्रकल्पांची माहिती नागरिकांसाठी एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सभेच्या यशस्वी आयोजनासाठी नरेडको पदाधिकारी, नेक्स्टजन सदस्य आणि कार्यकारी मंडळाने मेहनत घेतली. सभेचे प्रायोजक टेक एलेवेटर, अंशुमन अकुला आणि श्रद्धा अकुला हे होते. सूत्रसंचालन प्रसन्ना सायखेडकर यांनी तर आभार प्रदर्शन अभय नेरकर यांनी मानले.

पान १ वरून ...

अखेर ठाकरे बंधू एकत्र

तारीख निश्चित केली होती. यासंदर्भात शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांना फोन करून राज ठाकरे यांनी दोन मोर्चांऐवजी एकच मोर्चा काढावा. मराठी माणसाची एकजूट दिसून येईल, असे सुचवले. यासंदर्भात राऊत यांनी उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा केल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी ६ तारखेला आषाढी एकादशी असल्याने ७ जुलैचा दिवस निवडल्याचे सांगितले. त्यानुसार राज ठाकरे यांनी आपल्या मोर्चात सहभागी व्हावे किंवा ५ जुलै रोजी एकत्र आंदोलन करावे, असे सुचवले. याबाबत राऊत यांनी राज ठाकरे यांना कळवल्यानंतर त्यांनी ५ जुलैच्या मोर्चाला तत्काळ होकार दिल्याचे संजय राऊत यांनी सांगितले. मोर्चा कसा असेल? वेळ कोणती असेल? याविषयी चर्चा करणार आहोत. सकाळी १० वाजण्याची वेळ निश्चित झाली होती. मात्र ती वेळ सोयीची नाही. त्यामुळे या वेळेत बदल करण्यासाठी राज ठाकरे यांच्याशी चर्चा करणार असल्याचे संजय राऊत म्हणाले. पक्षाला शिवसेना म्हणवून घेणारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कुठे लपून बसले आहेत, असा सवाल संजय राऊत यांनी यावेळी केला. मंत्री उदय सामंत नेमकी कोणाची भूमिका मांडत आहेत. सर्व विरोध झुगारून त्यांनी मराठी भाषा, मराठी अस्मितेवर ठामपणे बोलायला हवे, असे ते म्हणाले.

खड्ड्यांची 'समृद्धी'?

बेफिकिरी दाखवली जाते. वेगवान म्हणवल्या जाणाऱ्या समृद्धी महामार्गावर इतक्या लवकर खड्डे पडतील याची कोणीच कल्पना केलेली नसेल, पण खड्डे पडले हे खरे! त्याचा बराच गाजावाजा झाल्यावर महामार्गावरील खड्डे आणि त्याची मापे मोजली गेली. खड्डे 'नगण्य' असल्याचेही जाहीर केले गेले व ते तातडीने बुजवून वेळ मारून नेण्यात आली. खड्ड्यांमळे महामार्गाचे काही नुकसान झाले नसल्याचे संबंधित अधिकाऱ्यांकडून ठासून सांगितले गेले. खड्ड्यांनी रस्त्यांचे नव्हे तर वाहनचालक व त्यांच्या वाहनांचे नुकसान होते. अपघात घडतात. प्रसंगी ते जीवघेणे ठरतात. याचा सोयीस्कर विसर का पडावा? ही झाली 'समृद्धी'वरील खड्ड्यांची बात! राज्यातील छोट्या गावांतील रस्त्यांपासून जिल्हा आणि राज्यमार्गांचे हेच दुखणे आहे. दर पावसाळ्यात बहुसंख्य रस्ते 'खड्ड्यात' जातात, ते कसे? अधून-मधून रस्ते दुरुस्ती केली जाते. फक्त रस्ते दुरुस्ती आणि खड्डे बुजवण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्ची घातला जातो. तरीही रस्त्यांवरील खड्डे 'जैसे थे' का राहतात? दर्जेदार रस्ते बांधण्याच्या घोषणा केल्या जातात. नव्या तंत्राने बांधलेले रस्ते अनेक वर्षे खराब होणार नाहीत, त्यांना खड्डे पडणार नाहीत, अशी ग्वाही दिली जाते. अनुभवाने माणसे शहाणी होतात, असे म्हणतात. मग सरकारी खात्यांतील अधिकाऱ्यांचा वर्षानुवर्षांचा अनुभव दर्जेदार रस्ते बांधणीसाठी कामी का येत नाही? खड्डे हे रस्ते अपघातांचे प्रमुख कारण आहे. अपघातांत तरुणांचे मृत्यू होण्याचे प्रमाण वाढत आहे. त्याबद्दल या खात्याचे केंद्रीय मंत्री वारंवार जाहीरपणे चिंता व्यक्त करतात. रस्त्यांची दुर्दशा होऊ नये, अपघात टाळावेत, असे सरकारला मनापासून वाटत असेल तर खड्डेमुक्त, दर्जेदार रस्ते राज्यातील आणि देशातील जनतेला मिळावेत. हाच त्यावरचा एकमेव उपाय असून त्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

अखेर विलास शिंदे निघाले

पक्षांतर करण्याची शक्यता दाटली होती. या पार्श्वभूमीवर विलास शिंदे यांनी गुरुवारी (दि.२६) मिसळ पार्टीचे आयोजन केले होते. त्यात कार्यकर्त्यांशी संवाद साधून पक्षात असलेल्या नाराजीबद्दल मते जाणून घेतली. यावेळी कार्यकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करतानाच दुसऱ्या पक्षात सन्मानाने जाण्याचा सल्ला दिला होता. या मिसळ पार्टीला २४ तास उलटत नाही तोच उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते खा. संजय राऊत यांनी महानगरप्रमुख पदावर मामा राजवाडे यांची थेट नियुक्ती केल्याचे जाहीर केले. त्याद्वारे विलास शिंदे यांचे पद काढून घेतल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे उबाठा पक्षांतर्गत नाराज असणारे व विशेषतः सातपूर विभागातील कार्यकर्त्यांची बेचैनी मोठ्या प्रमाणात दिसून आली.

विलास शिंदे यांना वैयक्तिक कारणांमुळे पक्षाला वेळ देता येत नव्हता. महानगरात शिवसेनेच्या माध्यमातून कार्यकर्ते मेळावे घेतले जात होते. त्यातही त्यांची उपस्थिती नव्हती. उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुखांनी ट्विट करून निर्णय घेतला आहे. शिवसेना पक्ष हा आदेशावर चालतो. त्यामुळे त्यांच्या आदेशाचे आम्ही पालन करू.
■ डी.जी. सूर्यवंशी, जिल्हाप्रमुख, शिवसेना ठाकरे पक्ष

मागील तीस वर्षांपासून एकनिष्ठेने शिवसेनेचे कार्य केले होते. प्रभागातील चारही नगरसेवक विजयी करण्यासोबतच पक्षाचे सातपूरमध्ये बळ टिकवून ठेवले होते. शिवसेनेच्या एकनिष्ठेचे हे फळ आहे. उबाठा गटात कार्यकर्त्यांना त्यांच्या भावना व्यक्त करण्यास बंदी आहे हे यातून दिसून येते. भावना व्यक्त करणे हा गुन्हा आहे काय?
■ विलास शिंदे, माजी महानगरप्रमुख, शिवसेना ठाकरे पक्ष

प्रधानमंत्री धरती आबा अभियानांतर्गत शिबिर

नाशिक । एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळवण अंतर्गत येणाऱ्या कळवण, सुरगाणा, सटाणा, मालेगाव, नांदगाव, चांदवड व देवळा तालुक्यातील गावांमध्ये ३० जून २०२५ पर्यंत प्रधानमंत्री धरती आबा जनभागिदारी अभियानांतर्गत अनुसूचित जमातीच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना वैयक्तिक आणि सामूहिक योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विविध शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी अकुनुरी नरेश यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. अभियानांतर्गत कळवण प्रकल्पांतर्गत येणाऱ्या सात तालुक्यातील ३७८ गावांचा समावेश आहे. आदिवासी क्षेत्र आणि समुदायांच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासाची खबरदारी घेऊन केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ या अभियानाच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. यामध्ये आदिवासी गावे व कुटुंबांच्या वैयक्तिक आणि सामूहिक विकासासाठी रस्ते, पक्की घरे, पाण्याची व्यवस्था, वीज पुरवठा, अंगणवाडी केंद्र बांधणे हे लाभ देण्याची कार्यवाही पुढील पाच वर्षांत करण्यात येणार आहे.

धरती आबा जनभागिदारी अभियानांतर्गत ३० जून २०२५ पर्यंत आयइसी शिबिरांचे आयोजन तालुकानिहाय करून या शिबिरांमध्ये अनुसूचित जमातीच्या नागरिकांना आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, जातीचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, भूमिहीन दाखला, अल्प भूधारक, शिधापत्रिका, एफआरए पट्टा वाटप, जॉब कार्ड, आयुष्यमान भारत कार्ड, किसान सन्मान निधी, किसान क्रेडिट कार्ड, जनधन बँक खाते, इपीक कार्ड, सिकलसेल तपासणी, पीएम आवास योजना, उज्ज्वला गॅस योजना, वीज जोडणी आदी वैयक्तिक लाभ देण्यात येणार आहेत. आदिवासी बांधवांनी या शिबिरांमध्ये सहभागी होत अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रकल्पाधिकारी अकुनुरी नरेश यांनी केले आहे.

नाशिकमध्ये लिवलाँगचा विस्तार

नाशिक । प्रतिनिधी

भारतातील आघाडीच्या कॉर्पोरेट विमापैकी एक असलेल्या लिवलाँगने नाशिकमध्ये प्रादेशिक विस्तार वाढवला आहे. ग्राहक आणि भागीदारांना जोडण्यासह चांगली सेवा देण्याच्या दृष्टिकोनातील एक महत्त्वाचे पाऊल असून नवीन शाखेतून आरोग्य विमा, कॉर्पोरेट ओपीडी आणि एसएमई व्हर्टिकलमध्ये वेगाने वाढ करण्यासाठी लक्ष केंद्रीत केले जाणार आहे.

लिवलाँगचे वितरण आणि विक्रीचे राष्ट्रीय प्रमुख मोहित भारद्वाज म्हणाले, नव्याने सुरू झालेली नाशिक शाखा ही महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ग्राहकांना अखंडित आणि एकात्मिक सुविधांसह हेल्थ इन्श्युरंस, बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी), प्रिस्क्रिप्शन, ऑनलाईन सल्ला, औषधे देण्याची व्यवस्था असेल. दुसरे म्हणजे, नाशिक शाखा स्थानिक भागीदारांच्या गरजांमधील तफावत दूर करेल. लिवलाँगने परवडणाऱ्या, उच्च दर्जाच्या आरोग्यसेवा उपलब्ध केल्या आहेत. उद्घाटनप्रसंगी आयसीआयसीआय लोम्बार्डचे राष्ट्रीय विक्री व्यवस्थापक आशिष गुप्ता आणि प्रादेशिक विक्री व्यवस्थापक विशाल जयस्वाल यांच्यासह महाराष्ट्र प्रादेशिकचे ब्रिजेश मिश्रा आणि वरिष्ठ उपस्थित होते. पुढील दोन वर्षांत भारतात १०० शाखा उघडण्याचा मानस आहे.

स्थानिक भाव

सोने (प्रति १० ग्रॅम)	
२४ कॅरेट	९६,३००
२२ कॅरेट	८८,६००
चांदी (प्रति किलो)	
१०८०००	

शेअर बाजार

सेन्सेक्स	८४,०५९
	(+३०३)
निफ्टी	२५,६३८
	(+८९)

बाजार भाव

कालचे कांदा भाव

	आवक (क्विं.)	किमान	कमाल	सरासरी
लासलगाव	२०५५०	६००	२१०१	१५००
विंचूर	१४०५८	५००	१८४६	१५५०
निफाड	३९०५	५००	१७५१	१५००
सायखेडा	३४२५	७००	२०००	१६००
पिंपळगाव	२०६००	८००	२२११	१६००

कांदा आवक टिकून

नाशिक । प्रतिनिधी

जिल्ह्यातील पावसाने थैमान घातले असले तरी बाजार समित्यांमध्ये गेल्या चार-पाच दिवसांपासून कांद्याची आवक टिकून आहे. त्याचबरोबर हवेत आर्द्रता वाढल्याने शेतकरी कांदा विक्रीस आणण्याचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे आज लासलगावला सुमारे २० हजार ५५० क्विंटल कांदा आवक झाली. तर पिंपळगाव बाजार समितीत २० हजार ६०० क्विंटल, विंचूरला १४ हजार क्विंटल कांदा विक्रीस आला होता. त्याचबरोबर नाशिक बाजार समितीच्या आवारात कॅरेटमधून कांदा विक्रीस आणणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक होते.

भेंडी, वांगे तेजीत

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक बाजार आवारात फळभाज्यांची आवक घटलेली आहे. तर मागणी अधिक पुरवठा कमी आहे. त्यामुळे भेंडी, वांगे, कारले, शेवगा, भोपळा, दोडका, गिलके आदी फळभाज्यांच्या प्रती जाळीचे दर लिलावात तेजीत आहे. भेंडी प्रतवारीनुसार ६०० ते ९०० रुपये जाळी प्रमाण विक्री होत आहे. तर घाऊक दरात ५० ते ६० रुपये किलो दराने विक्री झाली. डांगर ३० ते ५० रुपये किलो, शेवगा ८० ते १०० रुपये किलो, फ्लॉवर १०० ते २५० रुपये १० नगाचे गाठुडे, कोबीची जाळी १५० ते २५० रुपये कॅरेट, बीट २०० ते ३०० रुपये कॅरेट, वांगे ७०० ते ११०० रुपये जाळी दराने विक्री होताना दिसत होते. तर मेथी, शेपू, कांदापात आणि पालकाची आवक घटलेली होती. त्यामुळे यार्डात कोथिंबीर ५० ते ८० रुपये जुडी या दराने किरकोळ विक्री होत होती तर मिरची ६० ते १०० रुपये किलो दराने विक्री झाली.

शब्दकोडे : २८८



आडवे शब्द : १) प्रजाजन ३) गडीमाणसे ९) गोधडी १०) फणसाचा एक प्रकार ११) कर्ज घेणारा १३) धैर्य, हिम्मत १५) चाळीस शेर १७) सरसरीत १९) शिकारीचा प्राणी २१) नवाकोरा २३) अबोलीच्या फुलांची माळ २५) हजार किलो २६) मच्छर २७) सहाय्य २९) वर्ष, साल ३०) तारण ३२) जोराचा अघात, घाव ३३) आकाश ३४) मोठा हातोडा ३५) न थांबता ३७) नवप्रवेशित ४०) मदन ४२) जागृती ४३) येऊन पोहोचणे ४५) नाकारण्याचा हक्क ४६) मुसलमानांची प्रार्थना पद्धत ४८) कोळशाचा भूगा ४९) मासा पकडण्याचे एक साधन ५०) उंदरासारखा पण लांब तोंडाचा छोटा प्राणी ५१) वस्ती, राहणे ५२) तपासणीस ५४) पळून जाणे ५५) मालाची विक्री ५७) सत्वांश ५९) फोडातील द्रव ६०) निमग्न, गुंग ६१) दिवस ६२) आठवड्यातील तीन दिवसांची नावे ६७) धमकी, धाप ६८) बारीक मऊ केस ६९) वाणी, बोलणे

उभेशब्द : १) होडी २) निरूपयोगी ३) एक पालेभाजी ४) वेदना ५) बारीक खिळे ६) ललाट ७) ऋण ८) वाईट प्रकारचे मंत्रतंत्र ११) किंचीत कडू चव १२) किंमत १४) फसविले जाणे १६) भरीवच्या विरूद्ध १७) गवताचे रूंद पान १८) मातीचा कण २०) आपले राष्ट्रगीत २२) अस्वल २४) गाढव २७) थोर, मोठा २८) दार ३१) अगामी काळ ३३) नम्र वाकलेला ३६) गादीवर बसलेला राजा ३८) अतिशय उंच इमारत ३९) उपकार ४१) विष ४३) चालु दिवस ४४) सुंदर, मन हरणकरणारे ४५) नगरचा रहिवासी ४७) पंडू राजाच्या शेवटच्या बायकोचे नाव ४८) अफूचे बी ५१) एक पाताळ ५३) लेखणी ५४) प्रांत ५६) पाढे, पाढ्याची उजळणी ५८) सुर्याचे एक नाव ६१) शस्त्राचा घाव ६३) दात ६४) चंद्र ६५) आवाज, कीर्ती ६६) हिस्सा, भाग

शब्दकोड२८७चे उत्तर

ना	ता	ळ		रा	वा	चा	रं	क	हो	णे		व्रा		भि
त	ट		जा	स्त		प	गा	र			अं	त्य	या	त्रा
ल	वा	ज	मा		फ		चा		सां	ड	गा		त	
ग		पा	नि	प	त		भं	ग	डा		र	स	ना	
	आ		मा	र	वा		ग	ड		बा	की		म	म
क	ड	बा		च		मा	हो	द	य			पा	य	ल
र्ण		प	रा	क्र	म		णे		था			व		म
	रा	जा	जी		न	टी		क	ला	दा	ल	न		ल
पो		दे	व	स्था	न			ला	भ		व		आ	
ट	क		लो			प	र	का		अं	क	ग	णि	त
	च	र	च	री	त		ज	र	ब	दा	र			ड
स	रा		न	त	म	स्त	क			ज		गा	य	क
		को		स		व		स	र	प	ट	णे		सा
प	र	स	दा	र		नी	र	द		त्र			म	र
ट		रा	म		पा	य		न	र	क	या	त	ना	